|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
उमवि नगर, जळगाव-४२५००१ फोन: ०२५७-२२५७२७६, २२५७२७७फॅक्स: ०२५७-२२५८४०३, ४०६,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र. कबचौउमवि/१८/ ८८५ /२०२४ दिनांक: ०४/०९/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशात्र,समाजकार्य, विधी,
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था
जळगाव, धुळे आणि नंदूरबार

विषय : (CAS) पदोन्नतीसाठी स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) जळगाव,धुळे आणि नंदूरबार जिल्हानिहाय शिबिर आयोजित करणे बाबत.

महोदय,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील उन्नत अभिवृद्धी योजनेतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी स्टेज एक मधून स्टेज दोन मध्ये व स्टेज तीन मध्ये (Academic Level १० ते ११ आणि ११ ते १२) जाण्याकरीता पात्र अध्यापकांच्या प्रस्तावांची छाननी तथा मूल्यमापनासाठी जळगाव,धुळे आणि नंदूरबार जिल्हानिहाय शिबिर आयोजित करण्यासंदर्भात आदेश मा. कुलगुरु महादेयांकडून प्राप्त झाले आहेत.

सदरहू शिबिर आयोजनासाठी जळगाव, धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यातील महाविद्यालयांकडून शिबिर आयोजनासंदर्भात सहमती मागविण्यात येत आहेत. शिबिर आयोजनासंदर्भात आवश्यक त्या सुविधा उदा. आवश्यक कक्ष, पिण्याचे पाणी, प्रसाधन गृहे, आवश्यक मनुष्यबळ, दळणवळणाच्या सुविधा, आयोजनासंदर्भातील संपूर्ण जबाबदारी आदिंचा विचार सहमती देते वेळी करण्यात येणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे ज्या महाविद्यालयांना जिल्हानिहाय शिबिर राबविणेसंदर्भात इच्छा असेल त्यांनी आपली सहमती संस्था अध्यक्षांच्या परवानगीने निम्न स्वाक्षरीकर्ता यांना १० दिवसाच्या आत कळवावी ही विनंती.

आपला विश्वासू

उपकुलसचिव
(व्याख्याता मान्यता विभाग)

प्रत माहितीसाठी:
१. मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
२. मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव